लोकसत्ता ५.४.४.

# चोवीस तासांत हत्येचा उलगडा

## आरोपीला अटक

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**वसई :** विरारमध्ये ४० वर्षीय व्यक्तीची दगडाने ठेचून हत्या करणाऱ्या आरोपीला गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पथकाने २४ तासांच्या आत अटक केली आहे. जयराम आंबेकर असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे.

१५ मार्च रोजी विरार पूर्वेच्या नारंगी ते कोपरी जाणाऱ्या कच्च्या रस्त्याच्या बाजूला दीपक चव्हाण या व्यक्तीची दगडाने ठेचून हत्या करून टाकण्यात आले होते. या घटनेनंतर विरार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. घटनेचे गांभीर्य लक्षात घेत गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पथकाने चार पथके तयार करून तपास सुरू केला होता.

मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी जयराम आंबेकर या

गुन्हे वृत्त

आरोपीला २४ तासांच्या आत अटक केली. किरकोळ वादातून ही हत्या केल्याची कबुली आरोपीने दिली असल्याचे पोलिसांनी सांगितले आहे.

सदरची कारवाई विरार पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय पवार, पोलीस निरीक्षक प्रकाश मिसाळ, गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सहायक पोलीस निरीक्षक ज्ञानेश फडतरे, पोलीस उपनिरीक्षक अविनाश हाटखिळे व त्यांच्या पथकाने केली आहे.

# दुचाकी चोराला अटक

## चार गुन्हे उघड

**वसई :** दुचाकी चोरी करणाऱ्या आरोपीला विरार पोलिसांनी अटक केली आहे. अटक आरोपीकडून १ लाख ७० हजार किमतीच्या मुद्देमालासह ४ गुन्हे उघड केले आहेत.

वसई-विरार शहरात वाहनचोरीच्या घटना वाढू लागल्या आहेत. नुकतेच विरार पोलीस ठाण्याच्या हद्दीत दुचाकी चोरीला गेल्याची घटना घडली होती. या प्रकरणी विरार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

या घटनेनंतर विरार पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाने याचा तपास सुरू करून आरोपीला नालासोपारा येथील नगीनदासपाडा येथून अटक केली आहे. महेश काम्पली असे अटक आरोपीचे नाव असून त्याच्याकडून गुन्ह्यातील १ लाख ७० हजार रुपये किमतीच्या चार दुचाकी जप्त केल्या आहेत. याशिवाय विरार, तुळिंज, नारपोली या पोलीस ठाण्यात दाखल असलेले चार गुन्हे उघड केले आहेत.

विरार पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय पवार, पोलीस निरीक्षक (गुन्हे) सुशीलकुमार शिंदे, गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सहायक पोलीस निरीक्षक ज्ञानेश फडतरे, पोलीस उपनिरीक्षक अविनाश हाटखिळे व त्यांच्या पथकाने ही कारवाई केली.

लोकसत्ता पु.५-७.

# मिरा-भाईंदरमध्ये ६ आचारसंहिता पथके, ७४ ठिकाणी मतदान केंद्रे

## लोकसभा मतदारसंघात १७ हजार १० मतदारांची भर

**लोकसत्ता वार्ताहर**

**भाईंदर :** आगामी लोकसभा निवडणुकीसाठी मिरा-भाईंदर १४५ मतदार संघ हा सज्ज झाला आहे. यंदा निवडणुकीत १७ हजार नव्या मतदारांची भर पडली आहे. निवडणूक प्रशासनाने ७४ ठिकाणी मतदान केंद्राची उभारणी केली आहे. याशिवाय आचारसंहिता नियमांचे तंतोतंत पालन करण्यासाठी तीन स्थायी व तीन भरारी पथके स्थापन केली आहेत.

लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने मिरा-भाईंदर शहरातील कामकाज सुरळीत पार पडावे, यासाठी भाईंदर पश्चिम येथील तहसीलदार कार्यालयाची संपूर्ण इमारत 'मतदार संघाचे कार्यालय' म्हणून तयार करण्यात आले आहे. यावर्षी शहरातील चार लाख ३९ हजार २८३ मतदार हे निवडणुकीत मतदान करण्यासाठी पात्र ठरले आहेत. यात पुरुष दोन लाख ३३ हजार ६३५ तर महिला मतदारांची संख्या दोन लाख ०५ हजार ६२६ इतकी आहे. याशिवाय चार तृतीयपंथ आणि ३२ इतर मतदारांची नोंद करण्यात आली आहे. मागील लोकसभेच्या निवडणुकीत (२०१९ मध्ये) चार लाख २२ हजार २७३ मतदारांची नोंद झाली होती. त्यामुळे यंदा १७ हजार १० मतदारांची भर पडली आहे. त्यामुळे निवडणूक प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी ७४ मतदान केंद्र उभारण्यात आले आहे. ४१६ बूथही निर्माण करण्यात आले आहेत. शाळा, सभागृह आणि मोकळ्या जागेत मंडप उभारून तळ मजल्यावर हे बूथ उभारले जाणार आहेत.

### साडेतीन हजार कर्मचारी

**१४५ मिरा-भाईंदर मतदारसंघात आचारसंहिता नियमांचे तंतोतंत पालन व्हावे, म्हणून सहा पथके स्थापन करण्यात आली आहे. यात तीन भरारी आणि तीन स्थिर पथकांचा समावेश आहे. या निवडणुकीच्या कामात वर्ग एक ते वर्ग चारमध्ये मोडणारे जवळपास साडेतीन हजार कर्मचारी तैनात आहेत.**

मतदार यादीची पडताळणी केल्यानंतर यात मृत आणि स्थलांतरित झालेल्या तसेच दोनवेळा नोंदणी झालेल्या एकूण सात हजार १०९ मतदारांना वगळण्यात आले असल्याची माहिती निवडणूक विभागाचे कामकाज पाहणारे निवडणूक नायब तहसीलदार प्रदीप मुकणे यांनी दिली आहे.

# राजकीय पक्षांच्या अनधिकृत कार्यालयांवर कारवाई

**लोकसत्ता वार्ताहर**

**भाईंदर :** मीरा-भाईंदर शहरात बेकायदा उभारण्यात आलेल्या राजकीय पक्षांच्या कार्यालयांविरोधात अखेर महानगरपालिकेने कारवाईची मोहीम हाती घेतली आहे. शनिवारी शिवसेनेच्या कंटेनर शाखेवर आणि राष्ट्रवादीच्या कार्यालयावर कारवाई करण्यात आली.



शहरातील मुख्य चौकात तसेच पदपथावर शिवसेना (शिंदे गटाच्या) शाखा उभारण्यात आल्या आहेत. या कंटेनर शाखांवर कारवाई करण्याची मागणी भाजपकडून केली जात होती. यावरून शहरातील वातावरण पेटू (पान ३वर)

पुण्यनगरी ५.५.९.

# नायगाव उड्डाणपूल बनलाय मद्यपींचा अड्डा

## ▌पोलिसांचा धाक उरला नसल्याचा नागरिकांचा आरोप

▌**नालासोपारा :** नायगाव पूर्व-पश्चिमेला जोडणारा उड्डाणपूल हा मद्यपींचा अड्डा बनला असून दारू प्यायल्यानंतर त्या बाटल्या रस्त्यावर आणि घरांवर फेकत असल्याने रहिवाशांचा जीव धोक्यात आला आहे. गुन्हेगारीला आळा बसावा यासाठी नायगाव पोलीस ठाण्याची निर्मिती केली असून, गुन्हेगारावर वचक ठेवण्यात अपयशी ठरले आहे. या मद्यपींना पोलिसांचा धाक उरला नाही का, असा सवाल नागरिक विचारत आहेत.



अलीकडेच बांधण्यात आलेला नवीन पूल नागरिकांना फायद्यापेक्षा जास्त त्रास सहन करावा लागत आहे. या पुलावरून अनेकदा बाटल्या व इतर साहित्य, कचरा टाकण्यात येतो. रात्रीच्या सुमारास अज्ञातांकडून पुलावरून नारळ, हार-फुले व इतर अवजड सामानाने भरलेली गोणी अंधारात फेकून दिली. मिटनापाडा येथील रहिवासी मनोज पटेल यांच्या घरावर ही गोणी पडली. यात घरावरील पत्रे फुटले, मात्र त्यावेळी घरातील सदस्य बाहेर गेले असल्यामुळे दुखापत झाली नाही. **उपाययोजना करा, अन्यथा आंदोलनाचा इशारा** दळणवळणाच्या दृष्टिकोनातून नायगाव पूर्व-पश्चिम उड्डाणपूल बांधण्यात आला आहे. हा पूल रहिवाशांना त्रासदायक ठरला आहे. पुलाच्या खालच्या बाजूस राहणाऱ्या नागरिकांच्या घराचे पत्रे फुटून नुकसान झालेले आहे. दिवसेंदिवस अशा घटना सतत घडत असल्याने येथील रहिवाशांत भीतीचे वातावरण पसरले आहे. काही वाहनधारक या पुलावरून जाताना बेजबाबदारपणे वस्तू फेकत असतात.

यामुळे या भागात एखादा अपघात घडून जीवितहानी झाल्यावरच प्रशासन जागे होणार का? असा संतप्त सवाल समाजसेविका अभिलाषा वर्तक यांनी केला आहे. एमएमआरडीएने पुलावर आवश्यक उपाययोजना करून गैरप्रकारांना निर्बंध घालण्यासाठी सीसीटीव्ही लावण्यात यावे, अशी मागणी रहिवाशांनी केली आहे.

पुण्यनगरी ५.५.४.

# भाईंदरच्या अभिनव शिक्षण संस्थेत कोट्यवधींचा गैरव्यवहार

## ▌ लेखापाल शरण, माजी कार्याध्यक्ष फरार, संस्थेच्या पदाधिकाऱ्याने दिली माहिती

▌**मीरा रोड :** भाईंदरच्या आगरी समाजाच्या अभिनव शेतकरी शिक्षण संस्थेमध्ये कोट्यवधींचा गैरव्यवहार केल्याप्रकरणी तत्कालीन लेखापाल प्रशांत पाटील याला ठाणे न्यायालयाने पाच दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. तर तत्कालीन कार्याध्यक्ष मोहन पाटील फरार असल्याची माहिती संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी दिली.



अभिनव शेतकरी शिक्षण संस्थेत खिचडी, डिजिटल ओळखपत्र आणि संगणक दुरुस्तीच्या नावाखाली सुमारे सहा कोटी रुपयांचा घोटाळा करणाऱ्या लिपिक प्रशांत पाटील याने अखेर आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे यांच्यासमोर आत्मसमर्पण केले आहे. पाटील यांच्या गैरव्यवहारामुळे अभिनव शेतकरी शिक्षण मंडळाचे मोठे नुकसान झाले. शैक्षणिक संस्थेत एकेकाळी १५ ते १८ हजार विद्यार्थी शिक्षण घेत होते. आज ती संख्या २ ते ३ हजारांवर आली आहे.

संध्या पाटील यांच्या आदर्श महिला गटाकडून परस्पर शालेय पोषण आहारचे काम काढून मोहन पाटील यांनी ते स्वतःच्या मधुमोहन महिला बचत गटाला दिले. शासनाचा योजनेतील तांदूळ विकला. संगणक व पोषण आहारामधील घोटाळ्याची तक्रार व सतत पाठपुरावा केल्या नंतर २०१९ मध्ये नवघर पोलीस ठाण्यात तत्कालीन कार्याध्यक्ष मोहन पाटील, संस्थेचे लेखापाल प्रशांत नरेश पाटील, रिंग इंडियाचे भागीदार न्यूमान रेहमान, कुणाल गुडेकर, संस्थेचे वासुदेव पाटील, गुरुनाथ पाटील, दिलीप पाटील, शरद पाटील यांच्यावर गुन्हा दाखल झाला. नवघर पोलीस आरोपींना पाठीशी घालत असल्याने असा आरोप झाल्याने हा गुन्हा आर्थिक गुन्हे शाखेकडे वर्ग झाला. शनिवारी अभिनव विद्यालयाच्या आवारात संस्थेचे कार्याध्यक्ष अमोल पाटील, सचिव मंगेश पाटील, खजिनदार तथा माजी उपनगराध्यक्ष अशोक पाटील, माजी नगरसेविका उमा पाटील, प्रकाश पाटील, रमेश पाटील, नंदकुमार भोईर, विष्णू पाटील, चिंतामण पाटील, प्रभाकर पाटील आदींच्या उपस्थितीत पत्रकार परिषद घेण्यात आली. त्यावेळी ही माहिती देण्यात आली.

पुढारी पा.नं.३.

# दोन कोटी कर्जाच्या आमिषाने व्यापाराला गंडा

## बनावट कागदपत्रांद्वारे खरेदी केलेल्या १२ गाड्या जप्त; आंतरराज्यीय टोळी गजाआड

**नालासोपारा : विजय देसाई**

कोट्यवधी रुपयांच्या कर्जाची गरज असलेल्या एका व्यापाऱ्याला बँकेचा सीए असल्याचे भासवून कोट्यवधी कर्ज मिळवून देतो असे सांगत आर्थिक गंडा घातल्याचा प्रकार नालासोपारा भागात घडला आहे. एका व्यापाऱ्याला एका ठगाने चूना लावल्याची घटना अचोळे पोलिसांनी उघड करत महागड्या १२ कार ताब्यात घेतल्या आहेत. तसेच बँकेची बनावट एन.ओ.सी तयार करुन लोन वरील महागड्या कार परराज्यात विक्री करणाऱ्या आंतरराज्य टोळीला जेरबंद केले आहे.

याविषयी सविस्त हकिकत अशी की, नालासोपारा येथील व्यापारी जगदीश माळी यांना ऑक्टोबर २०२२ मध्ये आरोपीने तो बँकेचा सी.ए आहे अशी ओळख करुन देवून तो बँकांचे ऑडीट करीत असल्याचे सांगितले. माळी यांच्या किराणा दुकान व्यवसायासाठी २ कोटी रुपये लोन मंजुर करुन देतो असे सांगितले. पुढे जावून त्याने त्यांच्या व्यवसायाबाबत माहिती व दुकानाची कागदपत्रांच्या आधारे विविध बँकांमध्ये कर्ज मंजुर करण्यासाठी त्यांचे बँक ॲप्लीकेशन फॉर्म भरुन घेत ती कागदपत्रे महागड्या कार खरेदी करण्यासाठी बँकांमध्ये जमा केली. माळी व त्यांच्या पत्नीच्या नावे महागड्या कंपनीच्या कार खरेदी करुन त्यावर बनावट कागदपत्रांद्वारे वेगवेगळ्या बँकेचे कर्ज मंजुरही केले.



कोट्यवधींच्या महागड्या कारसह आरोपी पोलिसांच्या ताब्यात...

सदरच्या महागड्या कार व्यापारी माळी यांच्या ताब्यात न देता त्यांची एकुण २,८४,४९,००० रुपये इतक्या रक्कमेची फसवणुक केल्याप्रकरणी आचोळे पोलीस ठाण्यात २८ सप्टेंबर २०२३ रोजी मुख्य आरोपी राहुल गिरीश शहा याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

महागड्या कार खरेदी करुन २,८४,४९,०००रुपये रक्कमेची फसवणूक झालेबाबत गुन्हा नोंद झाल्यानंतर तसेच फसवणूक करणारी अंतरराज्य टोळी असण्याची शक्यता असल्याने गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेवून मीरा भाईंदर पोलीस आयुक्त मधुकर पाण्डेय,अपर पोलीस आयुक्त श्रीकांत पाठक, पोलीस उपायुक्त पौर्णिमा चौगुले-श्रींगी, सहाय्यक पोलीस आयुक्त उमेश माने- पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाळासाहेब पवार यांनी पथके तयार केली.

मुख्य आरोपी राहुल गिरीश शहा हा त्याचे स्वतःचे अस्तित्व लपवुन पुरावे नष्ट करुन बनावट आधार कार्ड व त्यावर स्वतःचे नाव बदलून कर्नाटक, पश्चिम बंगाल, दिल्ली व नेपाळ अश्या वेगवेगळ्या राज्यातील आलिशान हॉटिलमध्ये वास्तव्य करीत होता. त्यामुळे आरोपी मिळुन येत नव्हता. करीता शहा याचे विरुद्ध पुरावे प्राप्त करुन तांत्रिक विश्लशनाद्वारे शोध घेत असताना नमुद आरोपी हा हॉटेल मेलुहा द फर्न, पवई मुंबई या हॉटिलमध्ये वास्तव्य करीत असल्याबाबत खात्रिशिर माहिती प्राप्त झाली. राहुल याला हॅटिलमधून ताब्यात घेतले. त्यानंतर आरोपी विजय सुरजमनी सिंग, भिकाजी ऊर्फ उमेश बबन गोपाळे,मोहम्मद नजर मो. जाफर खान, प्रविण ऊर्फ राणु हुकूमचंद जैन ,आकाश धोंडीभाऊ मुसळे,विवेक रामदास करंडे यांनाही अटक करुन त्यांचे ताब्यातून २,३४,५३,३०२ रुपये किमतीच्या एकूण १२ महागड्या कार जप्त केल्या आहेत.

CamScanner

सकाळ पा.नं.३.

# पोलिस डायरीवरून नाराजी

## उपाययोजनांबाबत प्रतिज्ञापत्र देण्याचे न्यायालयाचे निर्देश

**सकाळ वृत्तसेवा**

मुंबई, ता. १८ : पोलिस ठाण्यातील गुन्ह्याची नोंद केली जाणारी स्टेशन डायरी अस्ताव्यस्त, विखुरलेल्या अवस्थेत आढळून आल्याने मुंबई उच्च न्यायालयाने राज्य सरकारवर चांगलेच ताशेरे ओढले. एफआयआर नोंदवण्यात येणारी स्टेशन डायरी सुस्थितीत ठेवण्यासाठी काय पावले उचलणार, असा सवाल करत न्या. अमित बोरकर यांच्या एकल पीठाने सरकारला प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे निर्देश दिले.

बनावट कागदपत्रांप्रकरणी पिंपरी-चिंचवड पोलिस ठाण्यात हितेश बंगारी यांच्याविरोधात गुन्हा दाखल झाला आहे. सत्र न्यायालयाने जामीन अर्ज फेटाळून लावल्याने त्याने अटकपूर्व जामिनासाठी ॲड. युवराज नरवणकर, ॲड. जयश्री माने यांच्यामार्फत मुंबई उच्च न्यायालयात अर्ज दाखल केला. त्या अर्जावर न्या. अमित बोरकर यांच्यासमोर सुनावणी घेण्यात आली. सुनावणीवेळी न्यायालयाने स्टेशन डायरी सादर करण्याचे निर्देश पोलिसांना दिले, मात्र या स्टेशन डायरीची विखुरलेली अवस्था आणि वाताहत झालेली पाहून न्यायालयाने तीव्र नाराजी व्यक्त केली. फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ नुसार प्रत्येक पोलिस ठाण्याने स्टेशन डायरी सुस्थितीत ठेवणे आवश्यक आहे. संबंधित पोलिस ठाण्याकडून तसे आढळून न आल्याने न्यायालयाने याबाबत सरकारला धारेवर धरत जाब विचारला. तसेच पोलिस ठाण्यातील पोलिस डायरींबाबत काय उपाययोजना केल्या आहेत, त्या बाबतचे प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे आदेश दिले.



### आदेशांचे स्मरण

◆ एका प्रकरणात मुंबई उच्च न्यायालयाने २२ नोव्हेंबर २०१८ रोजी केस डायरीबद्दल दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी काय पावले उचलली त्याबाबत विचारणा केली.

◆ आदेशात नोंदवलेल्या आश्वासनानुसार पावले उचलली गेली नाहीत तर पुन्हा सर्व तपास अधिकाऱ्यांना फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३च्या कलम १७२(१ब) चे पालन करण्यासाठी आवश्यक निर्देश जारी करेल, असे न्यायमूर्तींनी स्पष्ट करत या प्रकरणावरील सुनावणी ५ एप्रिलपर्यंत तहकूब केली.

पुढारी पु.पा.१.

# आचारसंहितेत रक्कम बाळगल्यास कारवाई

## केवळ ५० हजार रोख रक्कम बाळगण्यासच परवानगी

**भाईंदर : पुढारी वृत्तसेवा**

देशभरात लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता १६ मार्चपासून लागू झाली असून या कालावधीत ५० हजार रुपयांपर्यंतची रोख बाळगण्यास परवानगी देण्यात आली आहे. त्यापेक्षा जास्त रोख रक्कम बाळगायची असल्यास निवडणूक प्रशासनाची परवानगी अनिवार्य करण्यात आली आहे. मात्र या रोख रक्कमेची मर्यादा १ लाखांपर्यंत निश्चित करण्यात आली आहे. ५० हजारांपेक्षा अधिक विना परवानगी रोख रक्कम बाळगल्यास भरारी पथकाकडून कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे.

गेल्या निवडणुकीत २० हजार रुपयांची रोख रक्कम बाळगण्यास परवानगी देण्यात आली होती. मात्र यात अनेक व्यापारी मालाच्या विक्रीपोटी देय असलेल्या दैनंदिन वसुलीच्या माध्यमातून जास्त रोख रक्कम बाळगत असल्याने त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात आली होती. त्यावेळी अनेक व्यापाऱ्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली होती.

> "लोकसभा निवडणूक निमित्त देशात आचारसंहिता लागू झाली असून या निवडणुकीत मतदारांना पैशाचे अमिष दाखवून मते खरेदी करण्याचा गैरप्रकार होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार आचारसंहितेच्या कालावधीत रोख रक्कम बाळगण्यावर ५० हजारापर्यंतची मर्यादा निश्चित करण्यात आली आहे.
>
> **- प्रदीप मुकणे,**
> सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी

पुढारी पु.पा.

# वेश्यादलालाच्या ताब्यातून दोन मुलींची सुटका

**मिरा रोड :** मिरा भाईंदर व इतर ठिकाणी वेश्याव्यवसायासाठी मुली पुरवणाऱ्या बांगलादेशी वेश्यादलालावर अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष-भाईंदर पथकाने कारवाई करून त्याच्या ताब्यातुन दोन पिडित मुलींची सुटका केली आहे. एक बांगलादेशी वेश्यादलाल व त्याचे दोन साथीदार हे वेश्यागमनासाठी गिऱ्हाईकास मुंबई, ठाणे, काशिमीरा व मिरा-भाईंदर या परिसरात मुली पुरवीत असल्याची माहिती अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष-भाईंदर यांना मिळाली होती. त्यानूसार कायदेशीर बाबीची पुर्तता करुन छापा टाकला असता वेश्यादलालांसह त्यांच्या एका साथीदाराला ताब्यात घेण्यात आले.. दरम्यान आरोपी हा पारपत्र व व्हिसा शिवाय भारतात अनधिकृतपणे प्रवेश करुन वर्सोवा, अंधेरी प. परिसरात गेले ४ महिन्यापासुन वास्तव्य करत असल्याचे सांगितल्याने त्यास सापळ्यातील मुद्देमालासह ताब्यात घेत दोन पिडीत मुलींची सुटका केली. दरम्यान इतर फरार आरोपींचा शोध पोलीस घेत आहेत. त्यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांकडून अधिक तपास सुरू आहे.

सकाळ ५.पा.१.

# वसई-विरारवर जलसंक्रांत

## महापालिकेकडून टँकरने पाणीपुरवठा; जलवाहिनीच्या कामाला वेग




वसई, ता. १८ (बातमीदार) : वसई-विरार शहराला पुरेसा साठा उपलब्ध आहे; मात्र अनेक भागांत पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाली आहे. परिणामी महापालिकेकडून टँकरने पाणीपुरवठा केला जात आहे. नागरिकांना पाण्याची कमतरता भासू नये, यासाठी प्रशासनाने व्यवस्था केली आहे.

उष्णतेचा मारा सहन करत असताना अनेक ठिकाणचे नागरिक पाण्यासाठी तहानलेले आहेत. घशाची कोरड मिटवण्यासाठी कुणी पाणी देईल का पाणी, असा टाहो फोडण्याची वेळ आली आहे. वसई पूर्वेकडील अनेक भागांत पाण्याचे दुर्भिक्ष निर्माण झाले आहे. बोअरवेलला पाणी नाही, विहिरी आटल्या असून महापालिकेच्या नळजोडण्यांचा अभावदेखील आहे. त्यामुळे पिण्याच्या पाण्यासाठी महागड्या बाटल्या, खासगी टँकरचा आधार घ्यावा लागत आहे. यासाठी अधिकचे पैसे खर्ची होत असल्याने नागरिकांतून नाराजी व्यक्त होत आहे.

पावसाळ्याला अजून सुमारे साडेतीन महिन्यांचा कालावधी असल्याने तोपर्यंत टँकरचा आधार घ्यावा लागणार आहे.



वसई : महापालिकेच्या परिसरात टंचाई भासणाऱ्या ठिकाणी टँकरने पाणीपुरवठा करण्यात येत आहे. पाण्याचा टँकर पुन्हा कधी येईल, याचा नेमका अंदाज नसल्याने ड्रममध्ये पाणी भरण्यात येत आहे.

### सात तासांकरिता पुरवठा बंद

वसई-विरार महापालिकेला पाणीपुरवठा करणाऱ्या सूर्या धरणाच्या मासवन पंपिंग स्टेशन येथे वीज विभागाकडून दुरुस्ती व महापालिकेकडून धुकटन फिल्टर प्लांट येथे यांत्रिकी दुरुस्तीचे काम हाती घेण्यात आले होते. त्यामुळे शनिवारी (ता. १६) सात तासांकरिता सूर्या योजना टप्पा १ व ३ मधून होणारा पाणीपुरवठा पूर्णपणे बंद ठेवण्यात आला होता. त्यामुळे नागरिकांचे हाल झाले होते. अनेकांना बाटलीबंद पाणी खरेदी करावे लागले.

### टंचाईग्रस्त ठिकाणे


सातीवली, कामण, देवदल, ससुनवघर वसई फाटा, कोल्ही, चिंचोटी, कोल्ही आदी भागांतील गाव-पाडे तहानलेले आहेत. यात तांबड माळ, वैतरणा येथील फणसपाडा, खैरपाडा, चौधरी कंपाऊंड वसई फाटा येथील वरचा गडग्याचा पाडा, वाकण पाडा गाव, डोंगरपाडा, धांगड पाडा, बटर पाडा, सागपाडा, भिड्याचा पाडा, सोपारा फाटा, वांगणपाडा, डोंगरपाडा, गिदराई, पलाट पाडा, कुंवरा पाडा सातीवली, गणेश नगर, साग पाडा, जानकी पाडा, बेलकडी खिंडीपाडा, सावंत पाडा, टेपाचा पाडा, साईनगर, वैतरणा फणसपाडा आदी ठिकाणी टँकरने पाणीपुरवठा केला जात आहे. पाण्याचा पुरवठा प्रशासनाने पावसाळ्यापर्यंत कायम ठेवावा, अशी नागरिकांकडून मागणी करण्यात येत आहे.

### पाणीपुरवठा विभागाकडून आढावा

वसई-विरार महापालिका परिसरात ज्या ठिकाणी पाण्याची टंचाई निर्माण झाली आहे, त्याचा आढावा महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाकडून घेण्यात आला आहे. त्यानुसार मागणीनुसार टँकरने पाणी वितरित करण्यासाठी कार्यवाही सुरू करण्यात आली आहे. टँकरचे पाणी एका टाकीत जमा करून त्यानंतर नागरी वस्तीतील नागरिक हंडे, कळशा, ड्रममध्ये पाणी भरून नेत आहेत. टँकरची संख्या वाढवण्याची मागणी करण्यात येत आहे.

### पुरवठ्यामध्ये अनेक समस्या

फेब्रुवारीअखेरीस अथवा मार्चपासून पाण्याची गंभीर समस्या निर्माण होत आहे. नागरिकांना अनियमित, कमी दाबाने पाणीपुरवठा होतो. त्यातच काही वेळा पाण्याची गळती होते. याचबरोबर धरणाच्या ठिकाणी होणाऱ्या तांत्रिक दुरुस्तीमुळे पाणीपुरवठा बंद असतो. त्यातच उन्हाळ्यात पाणीटंचाई भासू लागली आहे.



### आठ टँकरच्या २३ फेऱ्या

पाण्याची गरज निर्माण झाली आहे, तिथे वसई-विरार महापालिकेकडून प्रतिदिन आठ टँकरने २३ फेऱ्यांनी पाणी वितरित करण्यात येते. जलवाहिनीचे काम सुरू आहे. त्यामुळे येत्या काही दिवसांत काही भागांत पाणी मिळू शकते.

CamScanner

लोकमत ५.५.४.

# महामार्गावर दोन अपघाती ठिकाणी होणार भुयारी मार्ग

## महामार्ग प्राधिकरणाची कामास मंजुरी

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** काशिमीरा भागातून जाणाऱ्या मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर पांडुरंग वाडी व दिल्ली दरबार हॉटेल येथे महामार्ग जीव मुठीत घेऊन नागरिक ओलांडत असताना अपघात अनेकांचे जीव गेले आहेत. अखेर या दोन्ही राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने भुयारी मार्ग मंजूर केले आहेत.

महामार्गावरून भरधाव वेगाने वाहने जात असल्याने पांडुरंगवाडी व लक्ष्मी बाग-दिल्ली दरबार हॉटेलदरम्यान महामार्ग ओलांडणे नेहमीच धोक्याचे झाले आहे. यात अनेकांना आपले जीव गमवावे लागले आहेत. या दोन्ही ठिकाणी पादचारी पुलाची मागणी खासदार राजन विचारे यांनी राष्ट्रीय महामार्गाचे प्रकल्प संचालक यांच्याकडे २०१५ मध्ये केली होती. कामे मंजूर झाली, परंतु मेट्रो कामामुळे ती बारगळली. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणामार्फत भुयारी मार्गाचे नियोजन करण्यात आले आहे.

### अपघात टळणार, जीव वाचणार!

अखेर राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणामार्फत भुयारी मार्गाचे नियोजन करून पांडुरंगवाडी व दिल्ली दरबार हॉटेल येथे नवीन भुयारी मार्गाची कामे मंजूर झाली आहेत. या दोन भुयारी मार्गासाठी ५० कोटी खर्चास मंजुरी मिळाली आहे. महामार्गाखालून हा २२ मीटरचा भुयारी मार्ग असणार आहे. पांडुरंगवाडी येथील भुयारी मार्गाची उंची साडेपाच मीटर असेल. त्यामुळे जड अवजड वाहनेसुद्धा या मार्गिकेचा वापर करू शकतील. दोन्ही बाजूस पदपथ विकसित होणार आहे. जेणेकरून त्या परिसरातील नागरिकांना दळणवळणासाठी सोय उपलब्ध होणार आहे, अशी माहिती खासदार राजन विचारे यांनी दिली. दोन्ही भुयारी मार्गाच्या कामास मंजुरी दिल्याबद्दल खा. विचारे यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे आभार मानले आहेत.


लोकमत ५.५.१

# सुताराची दगडाने ठेचून हत्या, आरोपीला अटक

## विरार गुन्हे प्रकटीकरण पथकाची कामगिरी

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** नारंगी कोपरी कच्ची खदान मार्गावर एका ४० वर्षीय सुताराची दगडाने ठेचून हत्या करण्यात आली होती. या प्रकरणातील आरोपीला अटक करण्यात विरारच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाच्या पोलिसांना यश मिळाले. आरोपीने ही हत्या पूर्ववैमनस्यातून केल्याची माहिती विरारचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक विजय पवार यांनी दिली आहे. आरोपीला २० मार्चपर्यंत पोलिस कोठडी सुनावण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले.




१५ मार्चला सकाळी कोपरी दीपक चव्हाण (४०) यांचा मृतदेह दगडाने ठेचलेल्या अवस्थेत सापडला होता. या प्रकरणी विरार पोलिस ठाण्यात अज्ञात आरोपीविरोधात हत्येचा गुन्हा दाखल केला होता. तपासासाठी वेगवेगळी ५ पथके तयार करून संशयित आरोपी जयराम शंकर आंचेकर (५५) याला ताब्यात घेतले. यावेळी त्याने किरकोळ कारणावरून झालेल्या वादामुळे दगडाने ठेचून दीपकला ठार मारल्याची कबुली दिली. या गुन्ह्यात कोणत्याही प्रकारचे धागेदोरे नसताना पोलिसांनी आरोपीला अटक करून गुन्हा उघडकीस आणला आहे.

या प्रकरणाचा तपास पोलिस उपायुक्त जयंत भजबळे, सहायक पोलिस आयुक्त बजरंग देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली विरारचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक विजय पवार, पोलिस निरीक्षक (प्रशासन) प्रकाश मासाळ यांनी केला.

लोकमत ५.५.१.

# हेवी डिपॉझिटवर खोली देण्याच्या नावे फसवणूक

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** मालाडच्या हावरे लिगन्सी येथे राहणारे विजया जाधव (४६) आणि साक्षीदार सागर नायर या दोघांची हेवी डिपॉझिटवर खोली देण्याच्या नावे फसवणूक झाली आहे.

विजया जाधव यांच्याकडून १८ ते २१ सप्टेंबरदरम्यान आरोपी योगेश करवत व शिवा शुक्ला यांनी हेव्ही डिपॉझिटवर खोली देतो, असे सांगून २ लाख ७० हजार रुपये घेतले. तसेच साक्षीदार सागर नायर यांच्याकडून १९ ते २७ सप्टेंबरदरम्यान वेळोवेळी योगेश करवत व शिवा शुक्ला यांनी हेवी डिपॉझिटवर खोली देतो, असे सांगून दोन लाख रुपये घेतले. मात्र खोली देण्याबाबत वेळोवेळी विनंती करूनही अद्याप हेवी डिपॉझिटवर खोली दिलेली नाही व पैसेही परत केलेले नाहीत. आरोपी कार्यालय बंद करून फरार झाले आहेत. माणिकपूर पोलिसांनी रविवारी ४ लाख ७० हजार रुपयांची फसवणूक केली, म्हणून गुन्हा दाखल केला आहे.

लोकमत पु.पा.१.

# विरारमधील अट्टल दुचाकी चोराला अटक



लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** दुचाकी चोरणाऱ्या आरोपीला अटक करण्यात विरार पोलिसांना यश मिळाले आहे. त्याच्याकडून चार दुचाकी हस्तगत करण्यात आल्या आहेत.


विरारच्या विवा तारांगण या इमारतीमध्ये राहणाऱ्या महर्षित तेजम (वय २०) या तरुणाची ९ मार्चच्या रात्री इमारतीसमोर पार्किंग केलेली इलेक्ट्रिक दुचाकी चोरट्याने चोरून नेली होती. विरार पोलिसांनी याप्रकरणी १२ मार्चला वाहन चोरीचा गुन्हा दाखल केला होता. या गुन्ह्याच्या अनुषंगाने विरार गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी गुन्ह्याच्या घटनास्थळी भेट दिली.

गुप्त माहितीच्या आधारे आरोपी महेश कांम्पली (वय २२) याला १३ मार्चला अटक केली आहे. पोलिसांनी आरोपीकडे कौशल्यपूर्ण तपास करून त्याच्याकडून गुन्ह्यातील वेगवेगळ्या कंपनीच्या १ लाख ७० हजार रुपये किमतीच्या चार दुचाकी हस्तगत केल्या. आरोपीकडून विरार येथील २, तुळींज येथील १ आणि नारपोली येथील १ असे एकूण ४ गुन्ह्यांची उकल केली आहे.

# ६९ वीजचोरांवर गुन्हा दाखल

**नालासोपारा :** नालासोपारा शहराच्या पूर्वेकडील नवजीवन, शांतीनगर, गांगडेपाडा, धानिवबाग, जाधवपाडा, गावदेवी, वाकणपाडा, पेल्हार या परिसरात लाखोंची वीज चोरी करणाऱ्या ६९ वीज चोरांवर नालासोपारा पोलिस ठाण्यात रविवारी तीन वेगवेगळे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या ६९ नागरिकांनी वीजचोरी दंडाचे वीज देयक भरले नाही. ते भरणा न केल्यामुळे कंपनीची १५ लाख ३६ हजार ८८० रुपये किमतीची वीज चोरून नुकसान केले आहे. महावितरणचे सचिन येरगुडे (३८) यांनी तक्रार दिली आहे.

# भीतीपोटी आत्महत्या



**नालासोपारा :** बावशेतपाड्याच्या किशोरी वैती चाळीत राहणाऱ्या प्रमोद मोरे (२५) या तरुणाने आत्महत्या केली आहे. त्याने रविवारी सकाळी दररोजच्या अशक्तपणाच्या आजारपणाला कंटाळून आणि कोणतरी मारण्यास येत असल्याचा भीतीपोटी वालीवच्या सुंदरनगर बिल्डिंग नंबर ३ च्या चौथ्या मजल्यावरून उडी मारून आत्महत्या केली आहे. वालीव पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

# दोन बहिणींचे अपहरण



**नालासोपारा :** शहराच्या मोरेगाव परिसरात राहणाऱ्या १५ आणि १३ वर्षांच्या दोन सख्ख्या बहिणींचे शनिवारी संध्याकाळी अपहरण झाल्याची घटना घडली. घटनेच्या दिवशी दोघी बिल्डिंग परिसरात खेळत होत्या. अज्ञात आरोपीने त्यांच्या अज्ञानपणाचा फायदा घेऊन, कशाचे तरी आमिष दाखवून फूस लावून पळवून नेल्याची तक्रार त्यांच्या आईने रविवारी तुळींज पोलिस ठाण्यात देऊन गुन्हा दाखल केला आहे.

# गळफास घेत आत्महत्या



**नालासोपारा :** पेल्हारच्या जाबरपाडा येथे राहणाऱ्या मोहम्मद इकलास शेख (५०) यांनी आत्महत्या केली आहे. त्यांनी शनिवारी दारूच्या नशेत राहत्या घरातील लोखंडी अँगलला ओढणीच्या साहाय्याने गळफास घेत आत्महत्या केली आहे. पेल्हार पोलिसांनी रविवारी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

CamScanner

लोकमत

# कार परराज्यांत विकणाऱ्या टोळीचा पर्दाफाश

## लोन घेण्यासाठी बँकांची बनावट एनओसी : दोन कोटींच्या १२ कार जप्त

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : बँकांच्या बनावट एनओसीद्वारे लोनवर घेतलेल्या महागड्या कार परराज्यांत विकणाऱ्या टोळीचा पर्दाफाश करण्यात आला आहे. या कारवाईत आचोळे गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पथकाने विविध राज्यांतून दोन कोटी ३४ लाखांच्या १२ कार जप्त केल्याची माहिती पोलिस उपायुक्त पौर्णिमा चौगुले-श्रींगी यांनी सोमवारी पत्रकार परिषदेत दिली.

आचोळे रोड परिसरात राहणाऱ्या जगदीश माळी यांना आरोपीने किराणा दुकानाच्या व्यवसायासाठी दोन कोटींचे कर्ज मंजूर करून देतो, असे सांगून त्यांची वैयक्तिक माहिती, दुकानाची कागदपत्रे घेत त्यांचा विश्वास संपादन केला. कर्ज मंजूर करण्यासाठी त्यांचे बँक ॲप्लिकेशन फॉर्म भरून घेतला. आरोपीने त्यांची कागदपत्रे महागड्या कार खरेदीसाठी बँकेत जमा करून जगदीश माळी आणि त्यांच्या पत्नीच्या नावावर खरेदी केले. बनावट कागदपत्रे व बनावट मेलद्वारे वेगवेगळ्या बँकांचे कर्ज मंजूर करून घेतलेल्या कारद्वारे त्यांची फसवणूक केली. हे लक्षात येताच त्यांनी आचोळे पोलिसांकडे तक्रार केली. या गुन्ह्याचा तपास उपायुक्त पौर्णिमा चौगुले-श्रींगी, एसीपी उमेश माने-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलिस निरीक्षक बाळासाहेब पवार, पोलिस निरीक्षक (गुन्हे) विवेक सोनवणे, विजय चव्हाण व पथकाने सुरू केला. तपासादरम्यान हाती लागलेल्या माहितीच्या आधारे आरोपी राहुल उर्फ सचिन उर्फ सौरभ शहा, विजय सिंग, भिकाजी उर्फ उमेश गोपाळे, मोहम्मद नजर खान, प्रवीण उर्फ राणू जैन, आकाश मुसळे आणि विवेक करंडे यांच्या मुसक्या आवळल्या.

### 'मास्टरमाइंड'चे नेपाळसह विविध राज्यांत वास्तव्य

या गुन्ह्यातील मुख्य आरोपी राहुल शहा हा पुरावे नष्ट करून बनावट आधार कार्ड व त्यावर स्वतःचे नाव बदलून कर्नाटक, पश्चिम बंगाल, दिल्ली व नेपाळ आदी ठिकाणच्या आलिशान हॉटेलमध्ये वास्तव्य करीत होता. आरोपी राहुल हा पवईतील 'मेलुहा द फर्न' या हॉटेलमध्ये असल्याची माहिती मिळाल्यावर त्याला तेथून ताब्यात घेतले. आरोपीकडून वेगवेगळ्या व्यक्तींच्या नावे असलेल्या सीमकार्डसह टीएनबी बँकेच्या बनावट एनओसी मिळून आल्या. त्याने जगदीश माळीच्या नावावर १२ महागड्या कार परराज्यांत विकल्याचे निष्पन्न झाले आहे.

Hello Vasai
Page No. 4 Mar 19, 2024
Powered by: erelego.com

CamScanner

हमारा महानगर
epaper.hamaramahanagar.net
19 Mar 2024 - Page 2

# अचोले पुलिस ने किया अंतरराज्यीय गिरोह का पर्दाफाश

**महानगर नेटवर्क**

**नालासोपारा**

आचोले पुलिस स्टेशन की डिटेक्शन ब्रांच की टीम ने एक बड़े गिरोह का भंडाफोड़ करने में सफलता पाई है। दरअसल,टीम ने फर्जी बैंक एनओसी बनाने और लोन पर महंगी कारें अन्य राज्यों में बेचने के आरोप में अंतरराज्यीय गिरोह का भंडाफोड़ किया है। टीम ने इनके पास से दो करोड़ से अधिक की 12 कार बरामद किया गया है। यह पूरी कार्रवाई एमबी पुलिस आयुक्तालय के पुलिस कमिश्नर मधुकर पांडेय व अतिरिक्त पुलिस आयुक्त श्रीकांत पाठक के आदेशानुसार डीसीपी (परिमंडल 2) पौर्णिमा चौघुले-श्रृंग्री व एसीपी उमेश माने-पाटील के मार्गदर्शन में पुलिस टीम ने कार्रवाई की। पुलिस अधिकारी ने कहा कि, 28 सितंबर 2023 को शिकायतकर्ता ने आचोले पुलिस स्टेशन में शिकायत दर्ज करायी कि,अक्टूबर 2022 में अभियुक्त ने खुद को बैंक का सीए बताया और कहा कि वह बैंकों का ऑडिट कर रहा है। शिकायतकर्ता व उसकी पत्नी के नाम से कंपनी की महंगी कार खरीदकर फर्जी दस्तावेज व फर्जी मेल के जरिए दूसरे बैंक से लोन स्वीकृत करा लिया। शिकायतकर्ता को उक्त कार की अभिरक्षा दिये बिना उनसे कुल 2,84,49,000 रुपए की धोखाधड़ी की गई। जिसके बाद आचोले पुलिस ने अभियुक्त के खिलाफ कलम 406,420,465,467,471,120 (बी) के तहत मुकदमा दर्ज कर लिया व जांच शूरू कर दी। पुलिस को जानकारी मिली की मुख्य अभियुक्त जिसका नाम




राहुल गिरीश शाह है,फर्जी आधार कार्ड का उपयोग करके और उस पर अपना नाम बदलकर अपने अस्तित्व को छुपा रहा था और सबूत नष्ट कर रहा था और कर्नाटक, पश्चिम बंगाल,दिल्ली और नेपाल जैसे विभिन्न राज्यों में आलीशान होटलों में रह रहा है। तकनीकी विश्लेषण के माध्यम से पता चाला की अभियुक्त होटल मेलुहा 'द' फर्न,पवई में रह रहा था। जब उक्त होटल में अभियुक्त की तलाश की गई तो पता चला कि वह सुरेश गोपाल भगत के नाम से फर्जी आधार कार्ड बनाकर रह रहा था। 3 फरवरी को उक्त अभियुक्त को उक्त होटल से हिरासत में लेकर उक्त अपराध में गिरफ्तार किया गया। उसके पास से 8 सिम कार्ड, 2 लैपटॉप,1 आई पैड, 9 मोबाइल 3,34,000 रुपए बरामद किये गये।

CamScanner

दैनिक

एक साथ प्रकाशित, पालघर, ठाणे, मुंबई.

# मुंबई केसरी टाइम्स

www.mumbaikesaritimes.com

वर्ष : १७ अंक : ३१२ मंगलवार १९ मार्च २०२४ मूल्य 2 रुपए Post-Reg- No. PLG/95/2020/2022 पृष्ठ : 04

# आचोले पुलिस स्टेशन की डिटेक्शन ब्रांच को सफलता

## महंगी कारें लोन पर अन्य राज्यों में बेचने वाले एक अंतरराज्यीय गिरोह को गिरफ्तार किया

आचोले पुलिस स्टेशन की डेटेक्शन ब्रांच की टीम ने एक बड़े गेरोह का भंडाफोड़ करने में सफलता गाई है। दरअसल,टीम ने फर्जी बैंक एनओसी बनाने और लोन पर महंगी कारें अन्य राज्यों में बेचने के आरोप में अंतरराज्यीय गिरोह को गिरफ्तार कर उन्हें जेल में ठूस दिया है। टीम ने इनके पास से २ करोड़ से अधिक का १२ कार बरामद किया गया है।यह पूरी कारंवाई एमबी पुलिस आयुक्तालय के पुलिस कमिश्नर मधुकर पांडेय व अतिरिक्त पुलिस आयुक्त श्रीकांत पाठक के आदेशानुसार डीसीपी (परिमंडल २) पौर्णिमा चौघुले-श्रृंगी व एसीपी उमेश माने-पाटील के मार्गदर्शन में आचोले पुलिस स्टेशन के सीनियर पीआई बालासाहेब पवार,पीआई विवेक सोनवणे (अपराध) व पीआई विजय चव्हाण के नेतृत्व में जंक्सन५ टीम सपोनि यशपाल सुर्यवंशी व पोउनि सुहास म्हात्रे की टीम ने की है।पुलिस अधिकारी ने कहा कि, २८ सितंबर २०२३ को शिकायतकर्ता ने शिकायत दर्ज (आचोले पुलिस स्टेशन) करायी कि,अक्टूबर २०२२ में अभियुक्त ने खुद को बैंक का सीए बताया और कहा कि वह बैंकों का ऑडिट कर रहा है।शिकायतकर्ता के किराना दुकान व्यवसाय के लिए २,००,००,००० (२ करोड़ रुपये) का ऋण स्वीकृत करके देता हूँ,यह कहते हुए कि,उसके व्यवसाय की जानकारी तथा दुकान के दस्तावेज प्राप्त कर,शिकायतकर्ता का विश्वास प्राप्त कर विभिन्न बैंकों में उससे ऋण स्वीकृत कराने के लिए उसका बैंक आवेदन पत्र भरवाकर उस दस्तावेज को महंगी कार खरीदने के लिए बैंक में जमा कर दिया।शिकायतकर्ता व उसकी पत्नी के नाम से कंपनी की महंगी कार खरीदकर फर्जी दस्तावेज व फर्जी मेल के जरिए दूसरे बैंक से लोन स्वीकृत करा लिया।शिकायतकर्ता को उक्त कार की अभिरक्षा दिये बिना उनसे कुल २,८४,४९,००० रुपये की धोखाधड़ी की गई।जिसके बाद आचोले पुलिस ने अभियुक्त के खिलाफ कलम ४०६,४२०,४६५,४६७,४७१,१२० (बी) के तहत मुकदमा पंजीकृत कर लिया व जांच शुरू कर दी।पुलिस अधिकारी ने कहा कि,जैसा कि ऊपर बताया गया है,महंगी कार खरीदकर



२,८४,४९,००० रुपये की धोखाधड़ी करने के संबंध में मामला दर्ज होने के बाद और अंतरराज्यीय धोखाधड़ी गिरोह की संभावना होने पर अपराध की गंभीरता को ध्यान में रखते हुए उक्त अपराध की जांच की जानी चाहिए। वरिष्ठ पुलिस अधिकारी द्वारा दिए गए निर्देश एवं मार्गदर्शन के तहत शीघ्रता से प्रकाश में लाया जाए एवं अभियुक्तों को गिरफ्तार करने के निर्देश डिटेक्शन ब्रांच के अधिकारी व कर्मचारियों को दिए गए।तदनुसार, डिटेक्शन ब्रांच के अधिकारी गुप्त मुखबिरों और तकनीकी विश्लेषण के माध्यम से फरार अभियुक्तों की तलाश कर रहे थे।पुलिस अधिकारी ने कहा कि,उक्त अपराध का मुख्य अभियुक्त जिसका नाम राहुल गिरीश शाह है, फर्जी आधार कार्ड का उपयोग करके और उस पर अपना नाम बदलकर अपने अस्तित्व को छुपा रहा था और सबूत नष्ट कर रहा था और कर्नाटक, पश्चिम बंगाल,दिल्ली और नेपाल जैसे विभिन्न राज्यों में आलीशान होटलों में रह रहा था। इसलिए आरोपी का पता नही चल सका,तकनीकी विश्लेषण के माध्यम से अभियुक्त के विरुद्ध साक्ष्य प्राप्त करते हुए यह सुनिश्चित किया गया कि उक्त अभियुक्त होटल मेलुहा 'द' फर्न,पवई मुंबई में रह रहा था। जब उक्त होटल में अभियुक्त की तलाश की गई तो पता चला कि वह सुरेश गोपाल भगत के नाम से फर्जी आधार कार्ड बनाकर रह रहा था,३ फरवरी को उक्त अभियुक्त को उक्त होटल से हिरासत में लेकर उक्त अपराध में गिरफ्तार किया गया।उक्त अभियुक्त के पास अलग-अलग व्यक्तियों के नाम से ८ सिम कार्ड हैं, नेपाल देश का १ सिम कार्ड,२ लैपटॉप,१ आई पैड ९ मोबाइल एवं फर्जी नाम पर ३ आधार कार्ड कुल कीमत ३,३४,००० रूपये बरामद किये गये।वहीं आरोपियों के पास फेडरल बैंक और टीएनबी की फर्जी एनओसी मिली है।पुलिस अधिकारी ने कहा कि,जांच के दौरान अभियुक्त बैंक में मुझे अच्छी तरह से जानने का दिखावा करेगा और उनसे कहेगा कि मैं तुम्हें लोन दूंगा और उनका विश्वास हासिल कर उनसे लोन से संबंधित जरूरी दस्तावेज हासिल कर,उक्त दस्तावेज को लगभग १० से १५ बैंकों में जमा करने के बाद शिकायतकर्ता की एक फर्जी ईमेल आईडी बनाकर उसके आधार पर शिकायतकर्ता के नाम पर परस्पर महंगी कंपनी की कारें खरीद ली और शिकायतकर्ता का फर्जी पता देकर उक्त कार खरीद ली और कार की आरसी बुक और उक्त कार की आरसी बुक मिलने से पता चला है कि बैंक कम लोन से संबंधित फर्जी एनओसी तैयार कर आरटीओ में जमा कर कारों को अन्य राज्यों में बेच रहा है,ऐसा निष्पन्न हुआ।पुलिस अधिकारी ने कहा कि,उक्त अपराध में अभियुक्त (१) राहुल ऊर्फ सचिन ऊर्फ सौरभ गिरीष शाहा (४१), (२) विजय सुरजमनी सिंह (४९), व्यवसाय- रियल एस्टेट एजेंट, (३) भिकाजी ऊर्फ उमेश बबन गोपाले,(४) मोहम्मद नजर मो.जाफर खान (४०),व्यवसाय-ज़ोमैटो डिलीवरी,(५) प्रविण ऊर्फ राणू हुकूमचंद जैन (३४),व्यवसाय-खरीद बिक्री,(६) आकाश धोंडीभाऊ मुसळे (२५) और (७) विवेक रामदास करंडे (२५),ऐसे कुल ७ अभियुक्तों को गिरफ्तार किया गया और उनके पास से कुल १२ महंगी कारें और जिनकी कीमत २,३४,५३,३०२ रूपये का माल बरामद किया गया है